# तुम्ही देवाची वाणी ऐकू शकता!

आपण राहत आहोत त्या युगात बुद्धिप्रामाण्यवाद आणि अनुभवसिद्ध, पृथक्करणात्मक विचारसरणी यांवर इतका काही जोर दिला जातो की, आपण देवाची वाणी ऐकू शकतो असा दावा जेव्हा एखादी व्यक्ती करते तेव्हा आपण त्या व्यक्तीची जवळजवळ थट्टा करतो. असे असले तरी अनेक कारणांमुळे आपण अशी थट्टा करीत नाही. पहिले कारण म्हणजे संपूर्ण पवित्र शास्त्रभर पुरुष आणि स्त्रिया देवाची वाणी ऐकतात. तसेच, आम्ही देवाची वाणी ऐकतो हे दाखवणारे अतिशय प्रभावी आणि प्रतिष्ठित असे देवाचे काही पुरुष आणि स्त्रिया आज जिवंत आहेत. सरतेशेवटी, देवाशी संभाषण करण्याची, त्याच्याशी बोलण्याची आणि आमच्या अंतःकरणात तो जे काही बोलत आहे ते ऐकण्याची तीव्र भूक आपल्याठायी आहे.

नव्याने जन्म पावलेला, पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणारा ख्रिस्ती या नात्याने देवाची वाणी ऐकण्यासाठी मी अनेक वर्षे अयशस्वी प्रयत्न केला. मी प्रार्थना केल्या, उपास केले, पवित्र शास्त्राचा अभ्यास केला आणि आतून काही वाणी येते की नाही हे ऐकण्याचा प्रयत्न केला, पण या सर्वांचा काही उपयोग झाला नाही. **मला ऐकू येईल अशी वाणी, असा आवाज माझ्या आत, अंतर्यामात नव्हता!** नंतर देवाने मला त्याची वाणी कशी ऐकावी हे शिकण्यासाठी, वाचण्यासाठी आणि अभ्यास करण्यासाठी एक वर्षभर वेगळे केले. त्या काळात देवाने मला **दुहेरी प्रार्थनेचा दरवाजा उघडणाऱ्या चार गुरुकिल्ल्या** शिकवल्या. त्या केवळ माझ्यासाठीच कार्यकारी आहेत असे नाही तर त्या कशा वापराव्या हे ज्या हजारो लोकांना शिकवले गेले त्यांच्यासाठीही उपयोगी आहेत, त्यामुळे त्यांच्या ख्रिस्ती अनुभवात दाट सलगी, स्नेहभाव निर्माण झाला, आणि त्यांच्या जीवनशैलीत बदल झाला हे माझ्या लक्षात आले. पुढे सांगितलेल्या किल्ल्यांचा उपयोग करून तुम्ही जर देवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर तुमच्याही बाबतीत असेच घडेल. या सर्व किल्ल्या हबक्कूक २:१,२ मध्ये आढळतात. पुढील भाग वाचण्यापूर्वी ही शास्त्रवचने तुम्ही वाचावीत असे मी तुम्हांला सांगतो.

## किल्ली # १ — आमच्या अंतःकरणात देवाचा आवाज हा स्वयंस्फूर्तपणे उचंबळणाऱ्या विचारप्रवाहासारखा असतो. म्हणून देवासोबतचे माझे संबंध व्यवस्थितपणे जोडले जातात, तेव्हा या स्वयंस्फूर्ततेशी मी जोडला जातो.

पवित्र शास्त्र सांगते, मग परमेश्वराने मला उत्तर दिले की... (हबक्कूक २:२). देवाच्या वाणीचा आवाज हबक्कूकला माहीत होता. शांत, मंद वाणी असे एलियाने त्या आवाजाचे वर्णन केले (१ राजे १९:१२). मी नेहमीच आतला **ऐकू येण्याजोगा** आवाज ऐकला, आणि देव वेळप्रसंगी अशा प्रकारे निश्चितच अशा प्रकारे बोलू शकतो आणि बोलतो. पण, माझ्या लक्षात आले की, **स्वयंस्फूर्त विचार, दृष्टान्त, भावना किंवा ठसा, छाप या प्रकारांनी देवाचा आतला आवाज आपल्याला पुष्कळदा ऐकायला मिळतो.** उदा. कधी कधी रस्त्याने गाडी चालवत असताना एखाद्या व्यक्तीसाठी प्रार्थना करण्याचा **विचार आपल्या मनात येतो ना?** त्या व्यक्तीसाठी आपल्याला प्रार्थना करायला सांगणारी ही देवाची वाणी आहे असे आपण सर्वसाधारणपणे समजून घेतो. यावर माझा तुम्हांला असा प्रश्न आहे की, ''तुम्ही गाडी चालवत असताना देवाचा हा आवाज तुम्हांला कशासारखा वाटला? तो ऐकू येण्याजोगा आतील आवाज होता का? का तुमच्या मनात झटकन चमकलेला हा स्वयंस्फूर्त विचार होता?'' तुमच्यापैकी पुष्कळजण म्हणतील की, स्वयंस्फूर्त विचारांप्रमाणे देवाची वाणी तुमच्याकडे आली.

म्हणून मी स्वतःशी विचार केला, ''देवाची वाणी किंवा देवाचा आवाज ऐकत असताना मी आतून उमटणारा स्वयंस्फूर्त विचारांचा प्रवाह ऐकला पाहिजे. कदाचित आत्म्याच्या पातळीवरचे संभाषण हे स्वयंस्फूर्त विचार, ठसे, भावना, आणि दृष्टान्त यांद्वारे मिळत असेल.'' प्रयोग आणि इतर हजारो लोकांकडून मिळालेली माहिती आणि यांवरून माझी खात्री झाली आहे की, हे असेच घडते.

पवित्र शास्त्र याला अनेक प्रकारे पुष्टी देते. मध्यस्थी किंवा रदबदली या शब्दासाठी असलेल्या *पागा (पॅगा)* या हिब्रू शब्दाची

व्याख्या ''आकस्मिकपणे पडलेली गाठ किंवा आकस्मिकपणे दिला जाणारा छेद'' अशी आहे. एखाद्या व्यक्तीसाठी किंवा लोकांसाठी मध्यस्थी करण्याचे ओझे देव आमच्या अंतःकरणावर ठेवतो तेव्हा ते तो पागाद्वारे म्हणजे आकस्मिकपणे आलेला विचार, आगंतुकपणे किंवा आकस्मिकपणे आमची विचारशृंखलेत व्यत्यय आणणे यांद्वारे करतो. म्हणून मी जेव्हा देवाशी सुव्यवस्थिपणे जोडला जातो, ट्यून केला जातो तेव्हा आकस्मिकपणे येणारे विचार किंवा स्वयंस्फूर्तपणे येणारे विचार यांच्याशी जोडला जातो.

जेव्हा मी शांतपणे प्रार्थनेद्वारे देवावर भार टाकतो तेव्हा स्वयंस्फूर्तपणे मनात उचंबळणारे विचारप्रवाह हे निश्चितच देवाकडून येतात हे माझ्या लक्षात आले आहे.

## किल्ली # २ — माझ्यामध्ये प्रवाहित होणारे, उचंबळणारे देवाचे विचारप्रवाह आणि भावना यांच्याशी संवेदनशील राहण्यासाठी, त्या लक्षात येण्यासाठी मी माझ्या स्वतःच्या विचारांवर आणि भावनांवर नियंत्रण ठेवायला शिकले पाहिजे.

हबक्कूकने म्हटले, ''मी आपल्या पहाऱ्यावर उभा राहीन, किल्ल्यावर पहारा करीन...'' (हब.२:१). देवाची शांत, मंद, उत्स्फूर्त वाणी ऐकण्यासाठी आपण प्रथम शांत, निवांत ठिकाणी गेले पाहिजे आणि आपले विचार व भावना यांवर नियंत्रण ठेवले पाहिजे हे हबक्कूकला माहीत होते. स्तोत्र ४६:१० हे वचन आपल्याला शांत राहण्यास आणि तो (देव) देव आहे हे समजून घेण्यास उत्तेजन देते. आपण आपला देह आणि मन शांत करतो तेव्हा आपण अनुभवू शकू असे सखोल आंतरिक ज्ञान (उत्स्फूर्त विचारधारा) आपल्या आत्म्यांमध्ये आहे.

देवाचा उत्स्फूर्त आवाज अधिक सुलभपणे, चांगल्या प्रकारे ऐकण्यासाठी स्वतःला शांत करण्याचे अनेक साधेसोपे मार्ग मला सापडले आहेत. शांत भक्तीगीताद्वारे देवावर प्रीती करणे हा माझ्यासाठी अधिक प्रभावी मार्ग आहे (२ राजे ३:१५). मी शांत (विचार, इच्छा आणि भावना) होऊन देवावर भार टाकतो तेव्हा दैवी प्रवाह प्रवाहित होतो. म्हणून मी शांतपणे भक्ती करतो आणि स्तब्ध, निःशब्द होतो, आणि त्या उत्स्फूर्त प्रवाहासाठी स्वतःला मोकळे, खुले करतो. ज्या गोष्टी करायला मी विसरलो त्या गोष्टींविषयीचे विचार माझ्या मनात येतात तेव्हा मी लिहून काढतो आणि त्यांना मनातून काढून टाकतो. जर दोषीपणाचे, आपण योग्य, लायक नसल्याचे विचार मनात येतात, तेव्हा मी पूर्णपणे पश्चात्ताप करतो, कोकऱ्याच्या रक्ताने मिळणारी शुद्धता स्वीकारतो, आणि त्याचा धार्मिकतेचा झगा घालून स्वतःला देवासमोर निष्कलंक सादर केलेले असे पाहतो (यशया ६१:१०; कलस्सै.१:२२).

येशूच्या सान्निध्यात शांत, स्तब्ध होऊन आणि माझ्या अंतःकरणात काय आहे हे त्याला सांगून मी माझी दृष्टी त्याच्यावर खिळवतो (हब.१२:२) तेव्हा आमच्यामध्ये दुहेरी संभाषण सुरू झाल्याचे मला पाहायला मिळते. देवाच्या राजासनाकडून माझ्याकडे उत्स्फूर्त विचार प्रवाहित होतात, आणि मी राजांच्या राजाशी प्रत्यक्ष संभाषण करीत असल्याचे मला आढळते.

देवाचे शुद्ध वचन तुम्हांला मिळावे असे वाटत असेल तर तुम्ही शांत, स्तब्ध होणे आणि तुमचे लक्ष योग्य प्रकारे केंद्रित झालेले असणे महत्त्वाचे आहे. तुम्ही जर शांत, निःस्तब्ध होणार नाही, तर तुमचे स्वतःचेच विचार तुम्हांला मिळतील. तुमचे लक्ष जर येशूवर योग्य प्रकारे केंद्रित झाले नसेल, तर तुम्हांला अशुद्ध प्रवाह मिळेल, कारण तुम्ही तुमची दृष्टी ज्यावर खिळवली असेल तर तुमचे उपजत विचार तेथून येतात. म्हणून, जर तुम्ही आपली दृष्टी येशूवर खिळवाल, येशूपासून उपजत विचार, प्रवाह तुमच्याकडे येतील. तुमच्या अंतःकरणातील एखाद्या इच्छेवर, आकांक्षेवर तुम्ही तुमचे लक्ष केंद्रित केले, तर त्या इच्छेपासून तुमच्या मनात विचार येतील. शुद्ध विचारप्रवाह येण्यासाठी तुम्ही अगोदर स्तब्ध, शांत, निश्चल झाले पाहिजे, आणि दुसरी गोष्ट म्हणजे, तुम्ही तुमचे विचार, तुमची दृष्टी काळजीपूर्वक येशूवर खिळवली पाहिजे. मी पुन्हा सांगतो की, शांतपणे राजाची स्तुतीभक्ती करणे, आणि नंतर शांत, स्तब्ध, निश्चल होणे यांद्वारे हे सहज साध्य होते.

## किल्ली # ३ — प्रार्थना करीत असताना, आत्म्यामध्ये सर्वसमर्थ देवाची स्वप्ने आणि दृष्टान्त पाहत मी माझे नेत्र येशूवर खिळवतो.

मागच्या परिच्छेदात या तत्वाचा उल्लेख आपण केलेला आहे, पण याविषयी आपण थोडा अधिक विचार करण्याची गरज आहे. हबक्कूकने म्हटले, ''मी आपल्या पहाऱ्यावर उभा राहीन...ते पाहीन,'' आणि देवाने म्हटले, ''हा दृष्टान्त लिहून काढ'' (हबक्कूक २:१,२). हबक्कूक प्रार्थना करीत असताना प्रत्यक्ष दृष्टान्त पाहणार होता हे लक्षवेधक आहे. देव त्याला जे काही दाखवणार होता ते आत्मिक जगात पाहण्यासाठी तो त्याच्या अंतःकरणाचे नेत्र उघडणार होता. ही मनोवेधक कल्पना आहे.

माझ्या अंतःकरणाचे नेत्र उघडून दृष्टान्त पाहणे याची कल्पना मी पूर्वी कधी केली नव्हती. पण, मी जितका अधिक याविषयी विचार करू लागलो, तेव्हा मी अगदी असेच करावे ही देवाची इच्छा आहे हे माझ्या लक्षात आले. त्याने माझ्या अंतःकरणाला डोळे दिले आहेत. आत्मिक जगात सर्वसमर्थ देवाचा दृष्टान्त आणि कार्य पाहण्यासाठी ते दिले गेले आहेत. माझ्या चोहोबाजूंना आत्मिक जग कार्य करीत आहे असा माझा विश्वास आहे. हे जग देवदूत, दुष्ट आत्मे, पवित्र आत्मा, सर्वोपस्थित देव आणि त्याचा सर्वोपस्थित पुत्र येशू यांनी भरले आहे. ते जग मी न पाहण्यासाठी माझी बुद्धिप्रामाण्यवादी संस्कृती याखेरीज दुसरे कसले कारण नाही. ही संस्कृती मला सांगते की, असले काही जग अस्तित्वात आहे यावर विश्वासदेखील ठेऊ नकोस आणि आत्मिक जग कसे पाहावे याविषयी ती मला काहीही मार्गदर्शन करीत नाही.

हे पाहण्यासाठी आवश्यक असणारी सर्वसाधारण अट म्हणजे, आपण पाहण्याची गरज आहे. दानीएल त्याच्या मनात दृष्टान्त पाहत होता आणि त्याने म्हटले, ''मी पाहिले... मी पाहत असता... मी... पाहिले'' (दानी.७:२,९,१३). आता मी प्रार्थना करीत असताना येशू माझ्यासोबत असल्याचे मी पाहतो, आणि तो माझ्याशी बोलत असताना, त्याच्या मनात असलेले विचार सांगत असताना आणि मनात असलेल्या गोष्टी करीत असताना मी त्याच्याकडे पाहतो. आपण जर नुसते पाहिले, तर आपल्याला पाहायला मिळेल हे पुष्कळ ख्रिस्ती लोकांच्या लक्षात येईल. येशू इम्मानुएल, आमच्यासोबत देव आहे (मत्तय.१:२३). हे इतके साधेसरळ आहे. उत्स्फूर्त आंतरिक विचार जसे तुम्हांला मिळतात, त्याच प्रकारे तुम्ही उत्स्फूर्त आंतरिक दृष्टान्त पाहाल. ख्रिस्त तुमच्यासोबत आनंदाने उपस्थित असल्याचे तुम्ही पाहाल, कारण ***ख्रिस्त तुमच्यासोबत आनंदाने उपस्थित असेल.*** खरे सांगायचे म्हणजे, हा आंतरिक दृष्टान्त बहुधा इतक्या सहजपणे तुमच्याकडे येईल की, हे आपलेच विचार आहेत असे समजून त्याकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती तुमच्यामध्ये येईल. (संशय हे सैतानाचे मंडळीविरुद्ध सर्वांत जास्त प्रभावी शस्त्र आहे). पण, हे दृष्टान्त जर तुम्ही लिहून ठेवत राहाल, तर त्या दृष्टान्तांमधील आशय केवळ देवाकडून येऊ शकतो हे लक्षात येऊन तुमचा विश्वास वाढेल व तो विश्वास संशयावर विजयी होईल.

देवाने करारातील त्याच्या लोकांना स्वप्ने व दृष्टान्त यांच्याद्वारे सतत स्वतःला प्रगट केले. उत्पत्तीपासून प्रगटीकरणापर्यंत त्याने तसे केले आणि प्रेषितांची कृत्येच्या २ ऱ्या अध्यायात पवित्र आत्मा दिला गेल्यामुळे आपण स्वप्ने व दृष्टान्तांची अपेक्षा केली पाहिजे असे म्हटले (प्रे.कृ.२:१-४,१७). आमचे परिपूर्ण उदाहरण असलेल्या येशूने सर्वसमर्थ देवाच्या सतत संपर्कात राहण्याची ही क्षमता दाखवली. त्याने म्हटले की, ***मी माझ्या स्वतःच्या इच्छेने काही करीत नाही, तर मी पित्याला जे काही करताना व बोलताना पाहतो तेवढेच केवळ करतो*** (योहान.५:१९,२०,३०). ***जीवन जगण्याचा किती आश्चर्यकारक मार्ग!***

येशू जसा देवाच्या इच्छेप्रमाणे जगला तसे जगणे आपल्याला शक्य आहे का? आम्हांला देवाच्या समक्षतेत जाता यावे म्हणून पडदा वरपासून खालपर्यंत फाडणे हा येशूचे मरण आणि पुनरुत्थान यांचा मुख्य हेतू होता, आणि आपल्याला त्याच्याजवळ जाण्याची आज्ञा दिलेली आहे (लूक.२३:४५; इब्री.१०:१९-२२). म्हणून मी जे काही सांगत आहे ते विसाव्या शतकातील बुद्धीप्रामाण्यवादी संस्कृतीच्या दृष्टीने नेहमीपेक्षा निराळे, अनैसर्गिक वाटत असले, तरी पवित्र शास्त्राची ती मध्यवर्ती शिकवण आणि अनुभव असल्याचे सांगितले आणि दाखवले आहे. जे मंडळीचे आहे ते सर्व मंडळीत पुनःस्थापित करण्याची ही वेळ आहे.

काही लोकांचा टोकाचा बुद्धिप्रामाण्यवादी स्वभाव आणि तितक्यात बुद्धिप्रामाण्यवादी संस्कृतीत राहत असल्यामुळे काही

लोकांना ही सत्ये आपलीशी करण्यासाठी अधिक मदतीची आणि आकलनाची गरज आहे. याच लेखकांनी लिहिलेल्या *कम्युनियन विथ गॉड* (देवाशी सहभागिता) या पुस्तकात ही मदत त्यांना मिळेल.

## किल्ली # ४ — आमच्या प्रार्थना आणि देवाने त्या प्रार्थनांची दिलेली उत्तरे यांची व्यवस्थित नोंद केल्यास, देवाची वाणी ऐकण्यासाठी आपल्याला मोठे स्वातंत्र्य, खुलेपणा मिळतो.

देवाने हबक्कूकला दृष्टान्त लिहिण्यास आणि पाट्यांवर ठळकपणे कोरण्यास सांगितले (हब.२:२). देवाच्या आज्ञेनुसार हबक्कूकने केले तसे माझ्या प्रार्थना आणि देवाने दिलेली उत्तरे लिहून काढण्याची कल्पना मला कधी सुचली नाही. या कल्पनेला पुष्टी देणारी वचने जर तुम्ही शोधली तर तुम्हांला शेकडो अध्याय (स्तोत्रसंहिता, पुष्कळ संदेष्टे, प्रकटीकरण) सापडतील. मग मला हा विचार का सुचला नाही?

मी याला रोजकीर्द (डायरी) लिहिणे असे म्हटले, आणि त्यावर प्रयोग करणे सुरू केले. देवाचा उत्स्फूर्त, आंतरिक प्रवाह स्पष्टपणे समजून घेण्यासाठी याचे खूप सहाय्य होते हे माझ्या लक्षात आले. कारण **देवावर सहजसुलभ विश्वास ठेवून दीर्घकाळपर्यंत मी विश्वासाने लिहू शकलो.** ते मिळत असताना मला त्याची चाचणी, परीक्षा घेण्याची आवश्यकता नव्हती, कारण हा प्रवाह संपल्यावर तो **पवित्र शास्त्राशी सुसंगत आहे की नाही याबाबत मी काळजीपूर्वक त्याचे परीक्षण करू शकत होतो.**

अशा प्रकारे नोंद ठेवण्याचा प्रयत्न तुम्ही केला तर तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. सुरुवातीसुरुवातीला संशय तुम्हांला अडखळवील, पण ही पवित्र शास्त्रीय कल्पना आहे, आणि देव उपस्थित असून त्याच्या मुलांशी बोलतो याची स्वतःला आठवण देऊन त्याला (संशयाला) झटकून टाका. स्वतःविषयी फार चिंता करू नका. तसे केल्यास तुम्ही तणावग्रस्त व्हाल आणि पवित्र आत्म्याच्या कार्यात अडखळण आणाल. आपण **आपले प्रयत्न** थांबवून देवाच्या विसाव्यात प्रवेश करतो तेव्हा तो मुक्तपणे संचरित होऊ शकतो (इब्री.४:१०). म्हणून चेहरा हसतमुख ठेवा, आरामात बसा, कागद आणि पेन घ्या आणि देवाची स्तुती भक्ती करून त्याचा शोध घेण्याकडे आपले लक्ष लावा. तुम्ही देवाला विचारलेला प्रश्न लिहून घेतल्यावर आणि शांत, स्तब्ध व्हाल आणि तुमच्यासोबत उपस्थित असलेल्या येशूकडे आपली दृष्टी लावाल, तर तुमच्या प्रश्नाला प्रतिसाद म्हणून फार चांगले विचार तुमच्या मनात येतील. त्यांचा संशय बाळगू नका. ते लिहून काढा. नंतर तुमच्या या नोंदी तुम्ही वाचाल, तेव्हा तुम्ही खरोखरच देवासोबत संभाषण करीत आहात हे लक्षात येऊन तुम्हीही आशीर्वादित व्हाल.

**काही अंतिम टीपा** : किमान नवीन करार (शक्यतो संपूर्ण पवित्र शास्त्र) पूर्णपणे अगोदर वाचल्याशिवाय तसेच दृढ, विश्वासू आध्यात्मिक पुढाऱ्याच्या अधीन झाल्याशिवाय कोणीही हे करण्याचा प्रयत्न करू नये. डायरी, रोजकीर्द लिहीत असताना ज्या प्रमुख दिशादर्शक बाबी लक्षात येतील, समजतील त्या समर्पित केल्याशिवाय त्यांनुसार कृती करू नये.

या विषयावरील पूर्ण शिक्षणाकरिता, किंवा देवासोबत सहभागिता ही अभ्यासपुस्तिका मागवण्यासाठी www.CWGministries.org वर किंवा ७१६-६५२-६९९० वर संपर्क साधा. मार्क आणि पॅटी विर्कलर यांच्या ५० पुस्तकांची सूची तसेच बहिस्थ पदवी मिळवण्यासाठी १०० कॉलेज अभ्यासक्रमांची माहिती वेबपेजवर उपलब्ध आहे. Email: cwg@cwgministries.org.